महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अंतर्गत संपादीत केलेल्या जमिनी विनाअधिसूचित करणे याकरीता उच्चाधिकार समितीची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. आयडीसी २०१८/प्र.क्र. ४४२/उद्योग-१४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ मे, २०१९

<u>वाचा</u> :- शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. आयडीसी १८९५/(२४६२)/उद्योग-१४, दि. ५ जुलै, १९९६.

<u>प्रस्तावना:</u>

सामान्य प्रशासन विभागाने दि. २८/८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मौजे. गोंदे दुमाला आणि वाडीवऱ्हे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील अधिग्रहीत जमिनी गैर अधिसूचित करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची चौकशी करण्यासाठी श्री. के.पी. बक्षी, निवृत्त अपर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी समिती नियुक्ती केली होती. सदर समितीने चौकशी अहवाल शासनास सादर केला असून प्रस्तुत चौकशी अहवालात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी शासनाने करावयाचे भूसंपादन व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमिनी विनाअधिसूचित करणे यांसदर्भातील कार्यपध्दती बाबत शिफारशी केलेल्या आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता जमीनी अधिसूचित करणे तसेच विनाअधिसूचित करणे याबाबतच्या कार्यपध्दती संदर्भात एकसुत्रता तसेच सुटसुटीतपणा यावा याकरीता सदर चौकशी समितीच्या अहवालातील शिफारशी व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता जमिनी संपादित करणे व महामंडळाच्या जमिनी विनाअधिसूचित करणे यासंदर्भात अस्तित्वात असलेले कायदे, नियम व कार्यपध्दती या बाबींचा सखोल अभ्यास करून कार्यपध्दती ठरविण्यासाठी सहमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मध्ये करावयाच्या सुधारणा तसेच उक्त शिफारशींच्या / प्रस्तावांच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत महामंडळाकरीता संपादीत केलेले क्षेत्र विनाअधिसूचित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रकरणांची छाननी करणे, तपासणे वा विनाअधिसूचित करण्यास प्रकरणनिहाय शिफारस करणे, याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता जमीन संपादीत करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या उच्चाधिकार समितीच्या धर्तीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता संपादीत जमिनी विनाअधिसूचित करणे याकरीता मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती नियुक्ती करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता संपादीत जमिनी विनाअधिसूचित करण्याकरीता प्रचलित नियमांचा अभ्यास करून प्रस्तावाची छाननी करणे व प्रकरणनिहाय विनाअधिसूचित करण्यास शिफारस करण्याकरीता शासन स्तरावर पुढीलप्रमाणे उच्चाधिकार समितीची नियुक्ती करण्यात येत आहे.

१)	अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (उद्योग), मंत्रालय मुंबई.	अध्यक्ष
२)	सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
३)	सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
४)	सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
५)	सचिव वा त्यांचे प्रतिनिधी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
६)	सहसचिव/ उपसचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	सदस्य
७)	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई	सदस्य सचिव

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता शासनाने अधिसूचित/ संपादीत केलेल्या जमिनी विनाअधिसूचित करण्याच्या प्रकरणास प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत उच्चाधिकार समितीने सदर प्रस्तावास/ प्रकरणास शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०५२८१५५७०८७४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Namdeo
Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2019.05.28 16:00:50 +05'30'

(डॉ. ना.कों. भोसले)
शासनाचे उप सचिव

प्रत :

१. मा. अपर मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
५. मा. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. मा. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. सर्व उपविभागीय अधिकारी,
१२. सह सचिव/ उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१४. स्वीय सहायक, मा. अपर मुख्य सचिव (उद्योग)
१५. निवडनस्ती (उद्योग-१४).